0 6 JUN 2021

लोकमत

जनसंपर्क कक्ष

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# परिसंस्थांना मोकळा श्वास घेऊ देणे हेच पुनर्जीवीकरण

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : विकासाच्या नावाखाली नैसर्गिक संसाधनांचा अतोनात ऱ्हास होत आहे. त्यामुळे परिसंस्थांना पुन्हा मोकळा श्वास घेऊ देणे, हेच त्यांचे पुनर्जीवीकरण आहे, असे प्रतिपादन जैवविविधता संशोधक केंद्र कॅरॅमल कॉलेज फॉर वूमन गोवा येथील प्राणीशास्त्र विभागाचे प्राध्यापक व जैवविविधता तज्ज्ञ डॉ. मनोज बोरकर यांनी केले. शिवाजी विद्यापीठात पर्यावरणशास्त्र विभागातर्फे घेण्यात आलेल्या वेबीनारमध्ये ते बोलत होते. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते.

जागतिक पर्यावरण दिनाचे आचित्य साधून शनिवारी विद्यापीठात पर्यावरणशास्त्र विभागाच्या आवारात कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते वेलीचे व झाडाचे रोपण करण्यात आले. परिसंस्थेचे पुनर्जिवीकरण या विषयावर ऑनलाइन माध्यमातून घेण्यात आलेल्या वेबिनारमध्ये पर्यावरणातील परिसंस्थेवर प्रकाश टाकतानाच बोरकर यांनी तारांतुला कोळ्यांचे परिसंस्थेतील स्थान आणि त्याच्याबाबतील संकटे यावरही अभ्यासपूर्ण प्रकाश टाकला.

प्रास्ताविक पर्यावरण शास्त्र विभागप्रमुख डॉ. आसावरी जाधव यांनी केले. प्राजक्ता सरकाळे हिने सूत्रसंचालन तर आभार डॉ. पल्लवी भोसले यांनी मानले. वेबिनारमध्ये विद्यार्थी, शिक्षक आणि पर्यावरणप्रेमींनी ऑनलाइन सहभाग घेतला.



पर्यावरण दिनाचे औचित्य साधून शनिवारी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी वृक्षारोपण करुन पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला.

## पृथ्वीवर पाहुण्यांप्रमाणे राहा : कुलगुरु शिर्के

- अध्यक्षीय समारोपात कुलगुरु डॉ. शिर्के यांनी पर्यावरण संरक्षणासाठी प्रत्येकाने प्रयत्न करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन केले.
- आपल्या प्रत्येक कृतीचा परिणाम होत असतो. पृथ्वीतलावर ज्याप्रमाणे इतर प्राणिमात्रांची उपस्थिती आहे त्याप्रमाणेच एक मनुष्यप्राणी आहे.
- त्यामुळे माणसाने आपण वसुंधरेचे मालक नसून पृथ्वीवर आलेल्या एका पाहुण्याप्रमाणे राहावे, मालकी हक्क गाजवू नये, शाश्वत विकासाची कास धरुन इथून पुढे तरी वसुंधरेवर होणारे आघात थांबवावेत, अशी भावना व्यक्त केली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 6 JUN 2021
पुण्यनगरी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र विभागाच्या आवारात वृक्षारोपण करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत अन्य मान्यवर.

# शाश्वत विकास हीच काळाची गरज

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के : पर्यावरण दिनानिमित्त वेबिनार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

पर्यावरण संरक्षणासाठी प्रत्येकाने प्रयत्न करणे गरजेचे आहे. शाश्वत विकासाची कास धरून येथून पुढील काळात वसुंधरेवर होणारे आघात थांबवावेत, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. पर्यावरण दिनानिमित्ताने आयोजित वेबिनारमध्ये ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, आपल्या प्रत्येक कृतीचा परिणाम होत असतो. पृथ्वीतलावर ज्याप्रमाणे इतर प्राणिमात्रांची उपस्थिती आहे त्याप्रमाणेच एक मनुष्यप्राणी आहे. त्यामुळे माणसाने आपण वसुंधरेचे मालक नसून पृथ्वीवर आलेल्या एका पाहुण्याप्रमाणे राहावे, मालकी हक्क गाजवू नये.

या कार्यक्रमामध्ये पर्यावरणशास्त्र विभागप्रमूख डॉ. आसावरी जाधव यांनी स्वागत आणि प्रास्ताविक केले. प्राजक्ता सरकाळे हिने सूत्रसंचालन केले. आभार डॉ. पल्लवी भोसले यांनी मानले. त्याचबरोबर पर्यावरणशास्त्र विभागाच्या आवारात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते वेलीचे व झाडाचे रोपण करण्यात आले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 JUN 2021
पुढारी

# शाश्वत विकास हीच काळाची गरज : कुलगुरू शिर्के

कोल्हापूर : पर्यावरण संरक्षणासाठी प्रत्येकाने प्रयत्न करणे गरजेचे आहे. शाश्वत विकास हीच काळाची गरज आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून शनिवारी सकाळी विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र विभागाच्या आवारात कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते वेली व झाडांचे रोपण करण्यात आले. यावेळी उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची उपस्थिती होती. गोवा विद्यापीठातील जैवविविधता तज्ज्ञ प्रा. डॉ. मनोज बोरकर यांनी मार्गदर्शन केले. पर्यावरणशास्त्र विभागप्रमुख डॉ. आसावरी जाधव यांनी प्रास्ताविक केले. प्राजक्ता सरकाळे हिने सूत्रसंचालन केले. डॉ. पल्लवी भोसले यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 6 JUN 2021
लोकमत

# विद्यापीठात आज सावंत यांचे व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे आज होणाऱ्या शिवस्वराज्य दिनानिमित्त सकाळी १० वाजता इतिहास अभ्यासक इंद्रजित सावंत यांचे 'शिवस्वराज्य' या विषयावर ऑनलाईन व्याख्यान होणार आहे. विद्यापीठाच्या 'शिव वार्ता' या युट्यूब वाहिनीवरून प्रसारित होणाऱ्या या व्याख्यानाचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 6 JUN 2021
लोकमत

# एमएस्सी, बीएस्सीचे निकाल जाहीर

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाने मार्चमध्ये घेतलेल्या ९ ऑनलाइन परीक्षांचे निकाल शनिवारी जाहीर करण्यात आले. यात एमएसस्सी, बीएसस्सी व बीएच्या वर्गाचा समावेश आहे. आतापर्यंत २८१ परीक्षांचे निकाल जाहीर झाले आहेत.

एमएस्सीतील कॉम्प्युटर सायन्स, इलेक्ट्रॉनिक्स, मायक्रोबायोलॉजी, इंडस्ट्रियल केमिस्ट्री अल्कोहोल टेक्नॉलॉजी, शुगर टेक्नॉलॉजी या परीक्षांचा यामध्ये समावेश आहे. बीएसस्सी व बीए यांचे निकाल जाहीर झाले आहेत.

0 6 JUN 2021

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# हवेची गुणवत्ता क्षणा-क्षणाला कळणार

## 'प्रदूषण नियंत्रण'कडून तीन केंद्रांना मंजुरी : कोल्हापुरात जागाही केली निश्चित

भीमगोंडा देसाई
लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शहरात तीन ठिकाणी अत्याधुनिक स्वयंचलित हवा गुणवत्ता तपासणी यंत्रणेची केंद्रे स्थापन करण्यात येणार आहेत. प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून त्यास मंजुरी मिळाली आहे. शिवाजी विद्यापीठ, ताराबाई पार्कातील सिंचन भवन, फुलेवाडीतील महापालिकेच्या जागेत ही यंत्रणा बसवण्यात येईल. लवकरच ही यंत्रणा कार्यान्वित करण्यासाठी प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रशासन प्रयत्नशील आहे.

देशातील १०८ शहरांत आणि महाराष्ट्रातील १७ सर्वाधिक प्रदूषित शहरांत कोल्हापूर शहराचा समावेश आहे. दरम्यान, शहरात दिवसेंदिवस वाहनांची संख्या वाढत असल्याने हवा प्रदूषणात भरच पडत आहे. याशिवाय धूळीकण, सल्फरडाय ऑक्सिजनसह इतर घटकांचेही प्रदूषण होत आहे. म्हणून राष्ट्रीय हरीत लवादाने प्रदूषण कमी करण्यासाठी उपाययोजना करण्याच्या सूचना प्रदूषण नियंत्रण मंडळास दिल्या आहेत. यानुसार रियल टाइम हवा प्रदूषणाची माहिती संकलित करण्यासाठी यंत्रणा बसवण्यासाठी 'प्रदूषण'ने पुढाकार घेतला. सद्या पर्यावरणशास्त्र विभागाकडून हवा प्रदूषणाचा अहवाल मॅन्युअल पद्धतीने तयार केला जातो. यामध्ये रियल टाइम माहिती मिळत नाही, त्यामुळे महापालिकेस हवा प्रदूषण रोखण्याच्या उपाययोजना करण्यावर मर्यादा येतात. म्हणून स्वयंचलित हवा गुणवत्ता तपासणी केंद्राचा प्रस्ताव प्रदूषण नियंत्रण प्रशासनाने पाठवला. त्यास मंजुरी मिळाल्यानंतर एका केंद्रासाठी आवश्यक जागेचा शोध घेण्यात आला. सायबर चौकातील केंद्रासाठी जागा शिवाजी विद्यापीठाने, तर सिंचन भवनातील केंद्रासाठी पाटबंधारे प्रशासनाने देण्याचे मान्य केले आहे.

### येथे आहेत मॅन्युअल केंद्रे

शहरातील पाच हवा प्रदूषण मापन यंत्रणेद्वारे मॅन्युअल पद्धतीने हवेतील प्रदूषणाचे प्रमाण शोधले जाते. अंबाबाई मंदिर, महाद्वार रोड, शिवाजी विद्यापीठ, दाभोळकर कॉर्नर, सीबीएस स्टँड येथे केंद्रे आहेत. या केंद्रावर शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरण शास्त्र विभागाचे नियंत्रण आहे. ही केंद्रे मॅन्युअल असल्याने अहवाल येण्यास विलंब लागतो.

प्रदूषण नियंत्रण मंडळ हवा प्रदूषण रोखण्यासाठी प्रयत्न करीत आहे. याचाच एक भाग म्हणून रियल टाईम हवा प्रदूषणाची माहिती संकलित करण्यासाठी शहरातील तीन ठिकाणी अत्याधुनिक अशा स्वयंचलित हवा गुणवत्ता तपासणी यंत्राची केंद्रे उभारण्यात येणार आहे.

- प्रशांत गायकवाड, उपप्रादेशिक अधिकारी, प्रदूषण नियंत्रण मंडळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 6 JUN 2021
लोकसत्ता

# परिसंस्थांचे पुनर्जीविकरण होणे ही काळाची गरज

## पर्यावरण अभ्यासक प्रा. डॉ. मनोज बोरकर यांचे मत

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**कोल्हापूर :** विकासाच्या नावाखाली नैसर्गिक संसाधनांचा अतोनात ऱ्हास होत आहे. त्यामुळे परिसंस्थांना पुन्हा मोकळा श्वास घेऊ देणे, त्यांचे पुनर्जीविकरण होणे ही काळाची गरज आहे, असे मत पर्यावरण अभ्यासक प्रा. डॉ. मनोज बोरकर यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र विभागाच्यावतीने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. प्रारंभी कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते वेलीचे व झाडाचे रोपण करण्यात आले. जागतिक पर्यावरण दिवस ह्या वर्षी 'परिसंस्थेचे पुनर्जीविकरण' विषयावर आधारित आहे. यावर गोवा येथील जैवविविधता तज्ज्ञ प्रा. डॉ. मनोज बोरकर यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी 'तारांतुला' कोळ्यांचे परिसंस्थेतील स्थान आणि त्याच्याबाबतीतील संकटे यावर प्रकाश टाकला.

कुलगुरू शिर्के यांनी, माणसाने आपण वसुंधरेचे मालक नसून पृथ्वीवर आलेल्या एका पाहुण्या प्रमाणे राहावे, मालकी हक्क गाजवू नये. शाश्वत विकासाची कास धरून इथून पुढे तरी वसुंधरेवर होणारे आघात थांबवावेत, अशी भावना व्यक्त केली. पर्यावरण शास्त्र विभागप्रमुख डॉ. आसावरी जाधव यांनी प्रास्ताविक केले. प्राजक्ता सरकाळे यांनी सूत्रसंचालन तर आभार डॉ. पल्लवी भोसले यांनी मानले. या कार्यशाळेमध्ये विद्यार्थी, शिक्षक, पर्यावरणप्रेमी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 6 JUN 2021
पुढारी

# कुलसचिव, परीक्षा मूल्यमापन मंडळ संचालकपदासाठी अर्ज प्रक्रिया सुरू

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने कुलसचिव आणि परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या संचालकपदासह चार विद्याशाखा अधिष्ठता पदांसाठीची अर्ज प्रक्रिया सुरू झाली आहे.

कोरोना व इतर कारणांमुळे विद्यापीठाच्या विविध पदांची प्रक्रिया रखडली होती. यापूर्वीच व्यवस्थापन परिषदेने विविध पदे भरण्यासाठी मान्यता दिली आहे. यासंदर्भात विद्यापीठ कायद्यानुसार प्रशासनाने नुकतीच कार्यवाही सुरू केली आहे. कुलसचिव, परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक, विज्ञान व तंत्रज्ञान शाखा अधिष्ठता, वाणिज्य व व्यवस्थापन अधिष्ठता, मानव्यशास्त्र अधिष्ठता, आंतरविद्याशाखा अधिष्ठता, क्रीडा विभाग संचालक, इनोव्हेशन व इन्क्युबेशन सेंटर संचालक, निरंतन शिक्षण विभाग संचालकपदांचा यात समावेश आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 JUN 2021
पुढारी

# ३० जणांना उपकुलसचिव, सहायक कुलसचिव, अधीक्षकपदी पदोन्नती

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर रखडलेल्या पदोन्नती अखेर शिवाजी विद्यापीठाने केल्या आहेत. ३० जणांना सेवाज्येष्ठतेनुसार उपकुलसचिव, सहायक कुलसचिव, अधीक्षकपदी पदोन्नती देण्यात आली आहे. याबाबतचा आदेश विद्यापीठ प्रशासनाने शनिवारी काढला आहे.

वर्षभरापासून विद्यापीठातील विविध पदांच्या पदोन्नती विविध कारणांमुळे थांबल्या होत्या. कोरोनामुळे यात अडथळा निर्माण झाला होता. यासंदर्भात शिवाजी विद्यापीठ सेवक संघाने आंदोलन केले. यात पदोन्नतीची मागणी करण्यात आली होती. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची भेट घेऊन पाठपुरावा सुरू होता. विद्यापीठाने संबंधितांना आर्डर काढल्या असून, उपकुलसचिव, सहायक कुलसचिव, अधीक्षक, सहायक अधीक्षक, वरिष्ठ लेखनिक, कनिष्ठ लेखनिक, जमादार, हवालदार, ग्रंथालय परिचर आदी पदांवर ३० जणांना नियमानुसार रोस्टरप्रमाणे पदोन्नती दिल्या आहेत. यामुळे अनेकांना दिलासा मिळाला आहे.



शिवाजी विद्यापीठातून...

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 6 JUN 2021
पुढारी

# विद्यापीठाच्या एमए, एमएस्सीच्या परीक्षा सुरळीत

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या वतीने हिवाळी सत्र परीक्षेंतर्गत शनिवारी एम.ए., एम.एस्सी., बी.ए., बी.एस्सी. अभ्यासक्रमांच्या परीक्षा ऑनलाईन पद्धतीने सुरळीतपणे पार पडल्या. दरम्यान, विद्यापीठातर्फे आजअखेर विविध अभ्यासक्रमांच्या सुमारे २८१ परीक्षांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत. यात एम.एस्सी. संगणकशास्त्र सत्र-१, एम.एस्सी. मायक्रोबायोलॉजी सत्र-१, बी.एस्सी. सेमिस्टर सत्र-३ व ४, एम.एस्सी. शुगर टेक्नॉलॉजी सत्र-१, बी.ए. सत्र-१ अभ्यासक्रमांचा यात समावेश आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 JUN 2021
पुढारी

# इंद्रजित सावंत यांचे आज व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे शिवस्वराज्य दिनानिमित्त रविवारी सकाळी दहा वाजता इतिहास संशोधक इंद्रजित सावंत यांचे 'शिवस्वराज्य' विषयावर विशेष ऑनलाईन व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. विद्यापीठाच्या 'शिव वार्ता' (https://www.youtube.com/c/ShivVarta) या वाहिनीवरून https://youtu.be/mh366COs_nw या लिंकद्वारे ते सकाळी दहा वाजता प्रसारित होईल .

06 JUN 2021

पुण्यनगरी


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# यशासाठी सातत्यपूर्ण सराव करणे गरजेचे

## शशिकांत शिंदे यांचे प्रतिपादन : सेट परीक्षा मार्गदर्शन शिबिरात ३४० विद्यार्थ्यांचा सहभाग

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

सेट अथवा नेट परीक्षा देत असताना या परीक्षांच्या अभ्यासक्रमात तार्किक बुद्धिमत्ता हा उपघटक महत्त्वाचा आहे. त्यामुळे या उपघटकासाठी निर्धारित केलेले गुण मिळवण्यासाठी सातत्यपूर्ण सराव करणे आवश्यक आहे. यातून या घटकाचे प्रश्न सोडवणे विद्यार्थ्यांना सहज शक्य होईल, असे मत जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था सिंधुदुर्गचे अधिव्याख्याता शशिकांत शिंदे यांनी व्यक्त केले.



शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र व आजीवन अध्ययन व विस्तार विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने सेट परीक्षा मार्गदर्शन व्याख्यानमालेत ते बोलत होते. यावेळी प्रा. डॉ. ए. एम. गुरव उपस्थित होते.

शशिकांत शिंदे म्हणाले, आज कोणतीही परीक्षा द्यायची म्हटली तर त्या परीक्षेच्या अभ्यासक्रमात तार्किक बुद्धिमत्ता हा घटक अंतर्भूत असतोच. व्यक्तीच्या विचार प्रक्रियेच्या संदर्भातील मापन करण्यासाठी या घटकांतर्गत प्रश्न विचारले जातात. या उपघटकाचे प्रश्न सोडवताना असे प्रश्न सोडविण्याचा सराव असणे गरजेचे असते. प्रश्नाचे योग्य आकलन झाल्याशिवाय याचे अचूक उत्तर शोधणे कठीण असते, यासाठी प्रश्नाचे आकलन हा भाग महत्त्वाचा आहे. व्याख्यानमालेसाठी राज्याच्या विविध भागातून २ हजार ३४० विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. आभार महेश चव्हाण यांनी मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 JUN 2021
तरुण भारत

# इतिहास संशोधक इंद्रजीत सावंत यांचे आज ऑनलाईन व्याख्यान

कोल्हापूर : शिवराज्याभिषेकदिनाचे औचित्य साधून शिवाजी विद्यापीठातर्फे रविवारी ६ रोजी इतिहास संशोधक इंद्रजीत सावंत यांचे 'शिवस्वराज्य' या विषयावर ऑनलाईन व्याख्यानाचे आयोजन करण्यात येत आहे. सकाळी १० वाजता या व्याख्यानाला प्रारंभ होईल. विद्यापीठाच्या 'शिव वार्ता' (https://www.youtube.com/c/ShivVarta) या युट्यूब वाहिनीवरुन व्याख्यान प्रसारित केले जाणार आहे. तसेच https://youtu.be/mh366COs_nw या लिंकद्वारेही व्याख्यानाचे प्रसारण करण्यात येणार आहे. व्याख्यानाचा समाप्तीनंतर कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते विद्यापीठाच्या प्रांगणातील छत्रपती शिवरायांच्या अश्वारुढ पुतळ्यास अभिवादन करण्यात येईल, असे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी कळविले आहे.